ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने
शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत,
ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता.जामखेड)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३१२ /२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र / ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/६३४/२०२३,
दिनांक २२/०८/२०२३.

२. या कार्यालयाकडील सेवानिलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/६३३/२०२३
दिनांक ०८/०५/२०२३.

३.या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ ग्रापं-३/ ई-मेल, दि.१८/०७/२०२४
(चौकशी अधिकारी नियुक्ती)

४. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/
सी. आर.९१/२०२४, दिनांक- १३/०८/२०२५

५. श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण,
ता.जामखेड यांचा सेवा तपशिल

६.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२१८१०३४/२५,
दि.१९/०२/२०२६.

७.गटविकास अधिकारी पंचायत समिती कर्जत यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/२५७/
२६,दि.०४/०३/२०२६ नुसार श्रीम बुधवंत यांचा खुलासा दि.०४/०३/२०२६.

८. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील
कलम ४ (२)

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता.जामखेड त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते.

संदर्भ क्रमांक ०३ नुसार श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता.जामखेड यांचे गैरतर्वना विरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.४ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०४ आरोपांपैकी ०२ आरोप सिध्द झाले आहेत व उर्वरित ०२ आरोप सिध्द झाले नाहीत. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. महाराष्ट्र

जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार पुढील एक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात दोन वर्षासाठी थोपविणे, ही शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. प्रकरणी संदर्भ क्रमांक ०७ नुसार श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता.जामखेड त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे. श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता. जामखेड यांचे खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त खुलाश्याच्या अनुषंगाने खुलासा ~~अंशत:मान्य~~/अमान्य करण्यात येत आहे.

सबब, श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता.जामखेड यांना पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने 02 वर्ष रोखणे. ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी . सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आंला असून त्याचा संकेताक २०२६०९२५०६०९५८ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2026 14:31:38
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत कार्यवाहीसाठी:-

१. श्रीम प्रमिला सर्जेराव बुधवंत, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत-दिघोळ/देवदैठण ता.जामखेड द्वारा – गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जि.अहिल्यानगर.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,कर्जत

२/-सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,जामखेड

४. कार्यासन ग्रापं-१,ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.